ज्ञानगंगा घरोघरी

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

नाशिक– ४२२ २२२

## शैक्षणिक सेवा विभाग

## संमंत्रक प्रशिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रम (C08) : माहितीपुस्तिका

**शैक्षणिक वर्ष : 2021–2022**

# संमंत्रक प्रशिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रम माहितीपुस्तिका

*अनुक्रमणिका*

**१. शैक्षणिक सेवा विभागाचा परिचय ............................................................ ३**

**२. शिक्षणक्रमाविषयी ............................................................ ३**

२.१ शिक्षणक्रमाची उद्दिष्टे व वैशिष्ट्ये

२.२ श्रेयांक

२.३ शिक्षणक्रमाची उपयुक्तता

२.४ शिक्षणक्रमाचा परिचय

२.५ शिक्षणक्रमाची संरचना

२.६ शिक्षणक्रमाचा कालावधी

२.७ अध्ययन पद्धती

२.८ अध्ययन साहित्य

२.९ क्षमता विकास

२.१० माध्यम

**३. प्रवेश पात्रता ............................................................ ५**

**४. मूल्यमापन प्रक्रिया ............................................................ ५**

४.१ स्वाध्याय

४.२ संमंत्रण व दूर शिक्षण प्रात्यक्षिक (OPN 067)

४.३ अभ्यासकेंद्र भेट अहवाल (OPN 068)

४.४ उत्तीर्णता पातळी

४.५ श्रेणी रचना

४.६ स्वाध्याय, प्रात्यक्षिके आणि अभ्यासकेंद्र भेट अहवाल जमा करणे

४.७ संपूर्ण शिक्षणक्रमाचे मूल्यमापन घटक

**५. अभ्यासकेंद्रे ............................................................ ७**

**६. विभागीय केंद्रे ............................................................ ८**

**७. विशेष सूचना/संपर्कासाठी ............................................................ ९**

**८. परिशिष्टे ............................................................ ११**

परिशिष्ट १ : संमंत्रक प्रशिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रमाचा पाठ्यक्रम (Syllabus)

परिशिष्ट २ : कृतिसत्रांचे वेळापत्रक

# १. शैक्षणिक सेवा विभागाचा परिचय

शैक्षणिक सेवा विभाग (Academic Services Division) हा विद्यापीठातील एक महत्त्वाचा शैक्षणिक विभाग आहे. गरजाधारित शिक्षणक्रमांची आखणी, अंमलबजावणी तसेच उच्च दर्जाच्या शैक्षणिक साहित्याची निर्मिती ही या विभागाची वैशिष्ट्ये आहेत. विद्यार्थ्यांना शिक्षणक्रम पूर्ण करण्यासाठी प्रोत्साहित करणे व त्यासाठी दर्जेदार मार्गदर्शन उपलब्ध करून देणे हे या विभागाने आपले ध्येय मानले आहे.

शैक्षणिक सेवा विभागाचे सर्व शिक्षणक्रम राज्यातील विविध अभ्यासकेंद्रांवर राबविले जातात. शैक्षणिक सेवा विभागातर्फे सदर अभ्यासकेंद्रांशी नियमित संपर्क राखला जातो आणि विद्यार्थ्यांनादेखील शैक्षणिक तसेच प्रशासकीय आधार पुरविला जातो.

सर्व शिक्षणक्रमांच्या विविध टप्प्यांवर गुणवत्ता निश्चितीसाठी सतत विशेष प्रयत्न केले जात असतात.

महाराष्ट्रात मुक्त विद्यापीठाची साधारणतः १०६ शिक्षणक्रमांची शिक्षणक्रमनिहाय १८०० अभ्यासकेंद्रे कार्यरत आहेत. या अभ्यासकेंद्रांचा विस्तारदेखील वेगाने होतो आहे व त्यासाठी प्रशिक्षित समंत्रकांची मोठ्या प्रमाणावर गरज निर्माण झाली आहे.

शिक्षणक्षेत्रात कार्यरत नसलेल्या अनेकांना शिक्षक म्हणून काम करण्याची आवड असते. अशा लोकांकडे पदव्युत्तर पदवी ही पात्रतादेखील असते. मात्र, शिक्षक म्हणून पूर्णवेळ सेवा देणे त्यांना शक्य होत नाही. असे अनेक लोक मुक्त विद्यापीठाच्या विविध अभ्यासकेंद्रांवर समंत्रक म्हणून काम करू शकतात. अशा संभाव्य समंत्रकांना शास्त्रोक्त पद्धतीने समंत्रणाचे प्रशिक्षण देण्याच्या हेतूने शैक्षणिक सेवा विभागाने 'समंत्रक प्रशिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रम' (Certificate Programme in Counsellor Training) विकसित केला आहे. हा शिक्षणक्रम पूर्ण करणाऱ्यांना व आवश्यक पदव्युत्तर शैक्षणिक पात्रता धारण करणाऱ्यांना उपलब्धतेनुसार समंत्रक होण्याची संधी मिळू शकते.

याबरोबरच शैक्षणिक सेवा विभागातून 'मानवी हक्क प्रमाणपत्र शिक्षणक्रम' हा शिक्षणक्रमही राबविला जातो. तसेच 'गांधी विचार दर्शन पदविका' हा शिक्षणक्रमही शैक्षणिक सेवा विभाग राबवित आहे.

# २. शिक्षणक्रमाविषयी

## २.१ शिक्षणक्रमाची उद्दिष्टे व वैशिष्ट्ये

### उद्दिष्टे

(१) मुक्त शिक्षण प्रणालीसाठी कुशल समंत्रक उपलब्ध होण्यासाठी प्रशिक्षण देणे.

(२) कार्यरत समंत्रकांचे समंत्रण तंत्रांचे ज्ञान व कौशल्ये अद्ययावत करणे.

(३) दूरशिक्षणासंबंधी सामाजिक जागरूकता निर्माण करणे.

### वैशिष्ट्ये

(१) प्रत्यक्ष कृतिसत्रातून समंत्रणविषयक मार्गदर्शन.

(२) प्रात्यक्षिक व स्वाध्यायांद्वारे तसेच अभ्यासकेंद्र भेट अहवाल या घटकांद्वारे मूल्यमापन.

(३) शिक्षणक्षेत्रात कारकीर्द करू इच्छिणाऱ्या संभाव्य शिक्षकांना अत्यंत उपयुक्त.

## २.२ श्रेयांक

हा शिक्षणक्रम प्रवेश घेतल्यापासून सहा महिने कालावधीचा आहे. शिक्षणक्रम बारा श्रेयांकांचा (Credit Points) असून तो विद्यार्थ्यांना समंत्रणाची कौशल्ये प्राप्त करून देईल. हा शिक्षणक्रम विद्यार्थ्याला दूरशिक्षण क्षेत्रामध्ये समंत्रण करण्यासाठी तज्ज्ञता मिळवून देईल.

## २.३ शिक्षणक्रमाची उपयुक्तता

(१) प्राथमिक व माध्यमिक स्तरावर सध्या कार्यरत असणाऱ्या शिक्षकांना हा शिक्षणक्रम पूर्ण केल्याने त्यांच्या अध्यापन कृतींमध्ये प्रभावी बदल घडवून आणता येतील.

(२) ग्रामीण भागातील उपक्रमशील शिक्षकांना या शिक्षणक्रमातून विद्यार्थ्यांना अधिक कृतिशील बनविण्यासाठी कौशल्ये प्राप्त होतील.

(३) अंगणवाडी सेविका/महिला बचत गट/आरोग्यसेविका/बालसंगोपन शिक्षणक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना 'समंत्रक प्रशिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रम' पूर्ण केल्यास दैनंदिन जीवनातील आंतरक्रिया अधिक प्रभावी करता येतील.

(४) दूरशिक्षण क्षेत्रात सेवा देऊ इच्छिणाऱ्या संभाव्य कर्मचारी/शिक्षक यांना अत्यंत उपयुक्त.

(५) प्रौढ शिक्षण संस्था/जनशिक्षण संस्था/गैरसरकारी स्वयंसेवी संस्था (NGO)/आरोग्य शिक्षणविषयक सेवा देणाऱ्या स्वयंसेवी संस्था यांमधील कर्मचाऱ्यांची संप्रेषण व समंत्रण कौशल्ये उंचावण्यास उपयुक्त.

(६) सदर शिक्षणक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यास **मुक्त विद्यापीठाच्या बी.एड. शिक्षणक्रमास प्रवेश घेताना दोन गुणांचा भारांक (प्रवेशास प्राधान्य) मिळेल.**

(७) पदव्युत्तर पदवीस्तरावर किमान द्वितीय श्रेणी (बी+) असणाऱ्या विद्यार्थ्याने सदर प्रमाणपत्र शिक्षणक्रम यशस्वीपणे पूर्ण केल्यास मुक्त विद्यापीठाच्या विविध अभ्यासकेंद्रांवर संबंधित शिक्षणक्रमांसाठी समंत्रक म्हणून काम करण्याची संधी मिळू शकते.

## २.४ शिक्षणक्रमाचा परिचय

सध्या जगभर मुक्त शिक्षणप्रणालीचा वेगाने विकास व विस्तार होत आहे. भारतात अनेक राज्यांमध्ये आतापर्यंत मुक्त विद्यापीठे व मुक्त शाळा स्थापन झाल्या आहेत. अनेक पारंपरिक विद्यापीठांमार्फतही

दूरशिक्षण पद्धतीने विविध शिक्षणक्रम राबविले जात आहेत. अनौपचारिक शिक्षण देणाऱ्या संस्था, प्रौढ शिक्षण संस्था, गैरसरकारी स्वयंसेवी संस्था यांच्यामार्फततही प्रबोधनाचे अनेक कार्यक्रम दूरशिक्षण पद्धतीने राबविले जात आहेत. वेगाने विकसित होत चाललेल्या दूरशिक्षण क्षेत्रात प्रशिक्षित मनुष्यबळाची संमंत्रक (कौन्सिलर्स) म्हणून मोठ्या प्रमाणावर गरज आहे. ही गरज भागविण्याच्या दृष्टीने सदर शिक्षणक्रमाची रचना करण्यात आलेली आहे.

प्रत्येकी एक दिवसाच्या चार पूर्णवेळ कृतिसत्रांमधून या शिक्षणक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळेल. तसेच आठ स्वाध्याय, दोन प्रात्यक्षिक व एक अभ्यासकेंद्र भेट अहवाल यांमधून विद्यार्थ्यांचे मूल्यमापन केले जाईल.

## २.५ शिक्षणक्रमाची संरचना

सदर शिक्षणक्रमातील आशयाच्या संकल्पना स्पष्ट करण्यासाठी चार कृतिसत्रे होतील. त्यांचा तपशील खालीलप्रमाणे –

### (अ) पहिले कृतिसत्र

हे कृतिसत्र पूर्ण एक दिवसाचे असेल. या कृतिसत्रात शिक्षणक्रमाची रचना, स्वरूप, महत्त्व स्पष्ट केले जाईल. दूरशिक्षण प्रणाली, मुक्त विद्यापीठाची कार्यप्रणाली, संमंत्रण संकल्पना, समुपदेशन–महत्त्व व उपयोग या संकल्पना स्पष्ट केल्या जातील. त्याचप्रमाणे स्वाध्याय व प्रात्यक्षिक प्रश्न या संदर्भात मार्गदर्शन केले जाईल.

### (ब) दुसरे कृतिसत्र

हे कृतिसत्र पूर्ण एक दिवसाचे असेल. या कृतिसत्रामध्ये प्रत्यक्ष संमंत्रण कसे करावयाचे, विविध तंत्रज्ञानाचा संमंत्रणासाठी प्रभावी वापर कसा करावा, विद्यार्थी असेच अन्य घटकांसाठी समुपदेशन प्रक्रिया या संदर्भात मार्गदर्शन केले जाईल. तसेच विद्यार्थ्यांच्या प्रश्न–शंका–अडचणींसंदर्भातदेखील मार्गदर्शन केले जाईल.

### (क) तिसरे कृतिसत्र

हे कृतिसत्र पूर्ण एक दिवसाचे असेल. या कृतिसत्रामध्ये प्रामुख्याने या शिक्षणक्रमातील मानसशास्त्राशी संबंधित दोन अभ्यासक्रमातील आशयाबद्दल संमंत्रण केले जाईल. मानसशास्त्राशी संबंधित अभ्यासक्रमाबाबत विद्यापीठाकडून अध्ययन साहित्य (पुस्तके) दिली जाणार नाहीत; तर संदर्भ–पूरक अध्ययन साहित्याची सूची या माहितीपुस्तिकेमध्ये दिलेली आहे. सदर साहित्य मिळवून अभ्यास करण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची असेल. त्यामुळे, तिसऱ्या कृतिसत्रामध्ये केवळ मानसशास्त्राच्या अभ्यासक्रमावर आधारित संमंत्रण कार्य होणे अपेक्षित आहे.

### (ड) चौथे कृतिसत्र

हे कृतिसत्रदेखील पूर्ण एक दिवसाचे असेल. मुक्त विद्यापीठाच्या कोणत्याही शिक्षणक्रमातील एका अभ्यासक्रमासाठी होणाऱ्या संमंत्रण सत्राची तसेच कार्यपद्धतीची सविस्तर माहिती संकलित करण्यासाठी अभ्यासकेंद्राला प्रत्यक्ष भेट आणि सहभाग, अभ्यासकेंद्र संयोजक, सहायक, सहभागी विद्यार्थी यांचेशी चर्चा, निरीक्षणे, नोंदी असे या कृतिसत्राचे स्वरूप असेल. सदर अभ्यासकेंद्र भेटीचे नियोजन या शिक्षणक्रमाच्या केंद्र संयोजकांच्या मार्गदर्शनानुसार करावयाचे आहे. या अभ्यासकेंद्र भेटीवर आधारित विद्यार्थ्यांनी त्याचा अहवाल लिहून जमा करावयाचा आहे.

## २.६ शिक्षणक्रमाचा कालावधी

सदर प्रमाणपत्र शिक्षणक्रम पूर्ण करण्याचा कालावधी सहा महिन्यांचा आहे. या शिक्षणक्रमांतर्गत चार कृतिसत्रे, आठ स्वाध्याय, दोन प्रात्यक्षिके व अभ्यासकेंद्र भेट अहवाल पूर्ण करणे अनिवार्य आहे. सदर शिक्षणक्रम पूर्ण करण्यासाठी विद्यार्थ्यांची नोंदणी त्या तुकडीपुरतीच ग्राह्य धरली जाते. त्यामुळे प्रवेश घेतल्यापासून विद्यापीठाने निर्धारित केलेल्या वेळापत्रकाप्रमाणे हा शिक्षणक्रम पूर्ण केला पाहिजे. प्रवेशित तुकडीसाठी विद्यापीठाने निर्धारित केलेल्या वेळापत्रकाप्रमाणे सदर शिक्षणक्रम पूर्ण न झाल्यास विद्यार्थ्यास पुनर्नोंदणी करता येणार नाही.

## २.७ अध्ययन पद्धती

सदर शिक्षणक्रम हा कृतिसत्रातून संमंत्रणाद्वारे प्रशिक्षणावर भर देणारा आहे. प्रत्यक्ष आंतरक्रियात्मक संपर्क कसा साधावा याचे कौशल्य विद्यार्थ्यांना प्राप्त व्हावे यासाठी सर्व कृतिसत्रांतून भर दिला जाईल. विद्यार्थ्यांना स्वयं–अध्ययनासाठी काही पुस्तके दिली जातील. त्याचप्रमाणे काही संदर्भ पुस्तकांची शिफारस केली जाईल. विविध ग्रंथालयांचा आधार घेऊन विद्यार्थ्यांनी स्वाध्याय व प्रात्यक्षिक कार्य पूर्ण करावयाचे आहे. संदर्भग्रंथ विद्यार्थ्यांनी स्वतः मिळवावयाचे आहेत.

## २.८ अध्ययन साहित्य

या शिक्षणक्रमातील स्वाध्याय तसेच प्रात्यक्षिक कार्यासंबंधी संकल्पना स्पष्ट होण्यासाठी विद्यापीठातर्फे प्रत्येक विद्यार्थ्यास खालील अध्ययन साहित्य संच (पुस्तके) दिला जाईल.

(१) प्रौढ व निरंतर शिक्षण

(२) अनौपचारिक शिक्षण

(३) मुक्त विद्यापीठातील शिक्षण

(४) संमंत्रण : तंत्र व मंत्र

(५) प्रथम वर्ष बी.ए./बी.कॉम. संमंत्रक मार्गदर्शिका

वरील पाच पुस्तकांचा वापर करून 'दूरशिक्षण (OPN 041)', मुक्त विद्यापीठातील शिक्षण (OPN 042)', आणि 'संमंत्रण कौशल्ये (OPN 043) या तीन अभ्यासक्रमांचे स्वाध्याय व प्रात्यक्षिक कार्य पूर्ण करावयाचे आहे. त्याचप्रमाणे, 'विद्यार्थ्यांसाठी मानसशास्त्रीय समुपदेशन व मार्गदर्शन' (OPN 065) आणि 'सर्वसाधारण मानसशास्त्रीय समुपदेशन' (OPN 066) या दोन अभ्यासक्रमांसाठी संदर्भ-पूरक पुस्तकांची सूची या माहितीपुस्तिकेमध्ये (परिशिष्ट ८.१) दिलेली आहे. त्यानुसार, सदर पुस्तके मिळवून या अभ्यासक्रमांचे स्वाध्याय पूर्ण करण्याची जबाबदारी विद्यार्थ्याची असेल.

### २.९ क्षमता विकास

प्रस्तुत शिक्षणक्रमामध्ये समाविष्ट असलेले अभ्यासक्रम हे दूर व मुक्त शिक्षण प्रणाली, प्रौढ-निरंतर-अनौपचारिक शिक्षण, संमंत्रण तंत्रे व साधने, विद्यार्थी तसेच अन्य गटांसाठी मानसशास्त्रीय समुपदेशन अशा वेगवेगळ्या संकल्पनांशी संबंधित आहेत. त्याचबरोबर, या सर्व संकल्पनांचा दूरशिक्षण प्रणालीमध्ये वापर आणि उपयुक्तता या प्रमुख उद्देशाने प्रस्तुत अभ्यासक्रम समाविष्ट केलेले आहेत.

या शिक्षणक्रमाद्वारे विद्यार्थ्यांच्या दूर व मुक्त शिक्षण प्रणालीसाठी आवश्यक असणाऱ्या संमंत्रण क्षमतांचा विकास होणे अपेक्षित आहे. त्याचप्रमाणे, विविध घटकांच्या मानसशास्त्रीय समुपदेशन प्रक्रियेशी संबंधित क्षमता नव्याने विकसित होण्यास तसेच पूर्वी असलेल्या क्षमता वृद्धिंगत होण्यास मदत होईल.

एकंदरीत या शिक्षणक्रमाद्वारे मानवी आधार देण्याची क्षमता, समोरच्या व्यक्तीच्या शैक्षणिक/व्यावसायिक समस्यांबाबत योग्य समुपदेशन क्षमता, नेतृत्वगुण तसेच निर्णयक्षमता प्राप्त होणे अपेक्षित आहे.

### २.१० माध्यम

विद्यापीठातर्फे देण्यात येणारी पुस्तके मराठीमध्ये उपलब्ध असतील. मानसशास्त्राच्या अभ्यासक्रमांसाठी सुचविण्यात आलेली संदर्भ पुस्तके मराठी तसेच इंग्रजी भाषेमध्ये उपलब्ध आहेत. विद्यार्थी त्यापैकी सोयीची पुस्तके स्वत: मिळवून वापरू शकतात. स्वाध्याय, प्रात्यक्षिक तसेच अभ्यासकेंद्र भेट अहवाल मराठी अथवा इंग्रजी भाषेमध्ये लिहून जमा करता येतील.

## ३. प्रवेश पात्रता

### ३.१ प्रवेश पात्रता

कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही विषयातील पदवी परीक्षा उत्तीर्ण.

**टीप :** प्रवेश पात्रता नसतानाही एखाद्या विद्यार्थ्याने प्रवेश घेतल्यास त्यास विद्यार्थीच सर्वस्वी जबाबदार राहील. शुल्क परत दिले जात नाही.

### ३.२ शिक्षणक्रम शुल्क

या शिक्षणक्रमाचे एकूण शुल्क रु.१८००/- (एक हजार आठशे मात्र) आहे. त्यापैकी **विद्यापीठाचा हिस्सा रु. ११००/- असून** तो प्रवेश अर्ज भरतेवेळी ऑनलाईन पद्धतीने भरावयाचा आहे. तसेच **अभ्यासकेंद्र हिस्सा रु. ७००/- असून** अभ्यासकेंद्र हिश्श्याची रक्कम अभ्यासकेंद्राने ठरविलेल्या पद्धतीने अभ्यासकेंद्रावर जमा करावी व त्याची पावती घ्यावी. ऑनलाईन पद्धतीशिवाय अन्य कोणत्याही पद्धतीने विद्यापीठ हिश्श्याची रक्कम स्वीकारली जाणार नाही.

**महत्त्वाचे :**
**विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज भरून झाल्यानंतर त्याचा प्रिंटआऊट घ्यावा. सदर प्रिंटआऊट अभ्यासकेंद्रावर जमा करावा. अभ्यासकेंद्र हिस्सा (शुल्क) तसेच प्रवेश अर्जाचा प्रिंटआऊट अभ्यासकेंद्रावर जमा केल्यानंतरच विद्यार्थ्यास या शिक्षणक्रमाचे उपलब्ध असलेले अध्ययन साहित्य (पुस्तके) प्राप्त होऊ शकेल.**

**विद्यार्थ्याने नोंदणी रद्द केली वा अन्य कोणत्याही कारणाने शिक्षणक्रम शुल्क परत केले जाणार नाही.**

## ४. मूल्यमापन प्रक्रिया

प्रस्तुत शिक्षणक्रमामध्ये एकूण ५०० गुणांसाठी मूल्यमापन केले जाईल. त्याअंतर्गत मूल्यमापन घटकांचा तपशील खालीलप्रमाणे :

(१) स्वाध्याय ३०० गुण
(२) प्रात्यक्षिक १०० गुण
(३) अभ्यासकेंद्र भेट अहवाल १०० गुण

### ४.१ स्वाध्याय

परिशिष्ट क्र. ८.१ मध्ये 'दूरशिक्षण' (OPN 041), 'मुक्त विद्यापीठातील शिक्षण (OPN 042)', संमंत्रण कौशल्ये (OPN 043)', 'विद्यार्थ्यासाठी मानसशास्त्रीय समुपदेशन व मार्गदर्शन' (OPN 065) आणि 'सर्वसाधारण मानसशास्त्रीय समुपदेशन' (OPN 066) या पाच अभ्यासक्रमांचा पाठ्यक्रम दिलेला आहे. विद्यार्थ्यांनी या सर्व पाठ्यक्रमांवर आधारित एकूण आठ स्वाध्यायांचे लेखन करावयाचे आहे. प्रत्येक विषयाच्या (अभ्यासक्रमाच्या) स्वाध्यायासाठी विद्यार्थ्याने स्वतंत्र स्वाध्याय वहीचा वापर करावयाचा आहे. म्हणजेच एकंदर पाच विषयांसाठी (अभ्यासक्रमांसाठी) पाच स्वतंत्र स्वाध्याय वह्या असतील. संबंधित विषयाचे स्वाध्याय (एक अथवा दोन) त्या त्या वहीमध्ये असतील. स्वाध्याय संख्या व गुण विभागणी खालील प्रकारे असेल.

| *अ. क्र.* | *अभ्यासक्रम* | *स्वाध्याय संख्या* | *प्रत्येक स्वाध्याय गुण* | *एकूण गुण* |
|---|---|---|---|---|
| १. | दूर शिक्षण (OPN041) | ०१ | २५ | २५ |
| २. | मुक्त विद्यापीठातील शिक्षण (OPN042) | ०१ | २५ | २५ |
| ३. | संमंत्रण कौशल्ये (OPN043) | ०२ | २५ | ५० |
| ४. | विद्यार्थ्यांसाठी मानसशास्त्रीय समुपदेशन व मार्गदर्शन (OPN065) | ०२ | ५० | १०० |
| ५. | सर्वसाधारण मानसशास्त्रीय समुपदेशन (OPN066) | ०२ | ५० | १०० |
| | | ०८ | | ३०० |

विद्यार्थ्यांनी स्वाध्याय आपल्या अभ्यासकेंद्रावरील केंद्रसंयोजक किंवा केंद्रसहायक यांच्याकडे तपासण्यासाठी सुपूर्द करावयाचे आहेत. **स्वाध्यायांचे प्रश्न व प्रात्यक्षिके यांची माहिती मार्गदर्शक पुस्तिकेतून आपणास मिळेल. 'स्वाध्याय व प्रात्यक्षिक मार्गदर्शक पुस्तिका' विद्यापीठाच्या वेबसाईटवर उपलब्ध असेल. विद्यार्थ्यांनी ती डाऊनलोड करून घ्यावी.**

विद्यार्थ्यांनी पाचही अभ्यासक्रमांसाठी आठ स्वाध्याय लिहून जमा करणे अनिवार्य आहे.

## ४.२ संमंत्रण व दूरशिक्षण प्रात्यक्षिक (OPN 067)

प्रात्यक्षिक या मूल्यमापन घटकासाठी १०० गुण निश्चित केलेले आहेत. त्याअंतर्गत विद्यार्थ्याने प्रत्येकी ५० गुणांच्या दोन प्रात्यक्षिक कार्याचे लेखन करावयाचे आहे. विद्यार्थ्याने प्रात्यक्षिकासाठी फुलस्केप आकाराची एक स्वतंत्र प्रात्यक्षिक वही तयार करावयाची आहे.

मुक्त विद्यापीठाच्या कोणत्याही शिक्षणक्रमातील एका अभ्यासक्रमावर आधारित संमंत्रण आराखडा एका प्रात्यक्षिकासाठी तयार करावयाचा आहे. दुसऱ्या प्रात्यक्षिकामध्ये कोणत्याही घटकाच्या संमंत्रणासाठीची पूर्वतयारी/टाचण तयार करावयाचे आहे.

प्रात्यक्षिकांचे प्रश्नदेखील 'स्वाध्याय व प्रात्यक्षिक मार्गदर्शन पुस्तिकेमध्ये' उपलब्ध असतील.

विद्यार्थ्यांनी प्रात्यक्षिक नोंदवही निर्धारित कालावधीत अभ्यासकेंद्रावर जमा करावी.

## ४.३ अभ्यासकेंद्र भेट अहवाल (OPN 068)

'अभ्यासकेंद्र भेट अहवाल' या मूल्यमापन घटकासाठी १०० गुण निर्धारित केले आहेत. त्याअंतर्गत, विद्यार्थ्यांनी य.च.म. मुक्त विद्यापीठाच्या कोणत्याही एका अभ्यासकेंद्राला कोणत्याही शिक्षणक्रमाची संमंत्रण सत्रे सुरू असताना भेट देऊन शिक्षणक्रम अंमलबजावणी, शैक्षणिक तसेच प्रशासकीय कार्य, अभ्यासकेंद्राचे व्यवस्थापन, कृतिसत्रांमधील संमंत्रण प्रक्रिया यासारख्या घटकांबाबत तेथील अभ्यासकेंद्र प्रमुख, संयोजक तसेच विद्यार्थी यांच्याशी सविस्तर चर्चा, निरीक्षण व नोंदी करणे अपेक्षित आहे. या अभ्यासकेंद्र भेटीतील चर्चा तसेच निरीक्षण यावर आधारित एक सविस्तर अहवाल (किमान २५–३० पृष्ठे) प्रत्येक विद्यार्थ्याने सादर करावयाचा आहे.

स्वाध्याय, प्रात्यक्षिक तसेच अभ्यासकेंद्र भेट अहवाल या तीनही घटकांचे मूल्यमापन अभ्यासकेंद्रावरील संबंधित अध्यापकांद्वारे करण्यात येईल. निर्देशित केल्यानुसार अभ्यासकेंद्र संयोजक सर्व मूल्यमापन घटकांची गुणदान यादी परीक्षा कक्षाकडे विहित मुदतीमध्ये ऑनलाईन पद्धतीने पुढील कार्यवाहीसाठी पाठवतील.

## ४.४ उत्तीर्णता पातळी

स्वाध्याय, प्रात्यक्षिक तसेच अभ्यासकेंद्र भेट अहवाल या तीन मूल्यमापन घटकांमध्ये उत्तीर्ण घोषित होण्यासाठी प्रत्येक अभ्यासक्रमात किमान ४०% गुण प्राप्त करणे आवश्यक असेल. म्हणजेच, या शिक्षणक्रमाच्या एकूण निर्धारित ५०० गुणांपैकी किमान २०० गुण प्राप्त करणे आवश्यक असेल.

## ४.५ श्रेणी रचना

(i) ४०% पेक्षा कमी – अनुत्तीर्ण

(ii) ४०–४९% – तृतीय

(iii) ५०–५९% – द्वितीय

(iv) ६०–६९% – प्रथम

(v) ७०% पेक्षा अधिक – विशेष प्रावीण्यासह प्रथम श्रेणी

**विशेष सूचना :** विद्यार्थ्यांना या शिक्षणक्रमाच्या मूल्यमापनासाठी आवश्यक असलेले स्वाध्याय, प्रात्यक्षिक तसेच अभ्यासकेंद्र भेट अहवाल यांचे लेखन करून अभ्यासकेंद्रावरील संबंधित अध्यापकांकडे एकदाच जमा करता येईल. मूल्यमापनाद्वारे त्यापैकी काही अथवा सर्व घटकांमध्ये अनुत्तीर्ण झाल्यास पुन्हा लिहून जमा करता येणार नाही.

## ४.६ स्वाध्याय, प्रात्यक्षिके आणि अभ्यासकेंद्र भेट अहवाल जमा करणे

विद्यार्थ्यांना स्वाध्याय, प्रात्यक्षिके आणि अभ्यासकेंद्र भेट अहवाल लिहून एकदाच जमा करता येईल. त्यात अनुत्तीर्ण झाल्यास पुन्हा जमा करण्याची संधी नाही. हे सर्व मूल्यमापन घटक निर्धारित मुदतीमध्येच अभ्यासकेंद्रावर जमा करावेत. मुदतीनंतर स्वाध्याय, प्रात्यक्षिके आणि अभ्यासकेंद्र भेट अहवाल जमा करता येणार नाही.

सदर शिक्षणक्रमासाठी पुनर्नोंदणी (Re-registration) करण्याची सुविधा नाही.

## ४.७ संपूर्ण शिक्षणक्रमाचे मूल्यमापन घटक

| अ.क्र. | अभ्यासक्रम | मूल्यमापन घटक व संख्या | गुण |
|---|---|---|---|
| १. | दूरशिक्षण (OPN 041) | स्वाध्याय (०१) | २५ |
| २. | मुक्त विद्यापीठातील शिक्षण (OPN 042) | स्वाध्याय (०१) | २५ |
| ३. | संमंत्रण कौशल्ये (OPN 043) | स्वाध्याय (०२) | ५० |
| ४. | विद्यार्थ्यांसाठी मानसशास्त्रीय समुपदेशन व मार्गदर्शन (OPN 065) | स्वाध्याय (०२) | १०० |
| ५. | सर्वसाधारण मानसशास्त्रीय समुपदेशन (OPN 066) | स्वाध्याय (०२) | १०० |
| ६. | संमंत्रण व दूरशिक्षण प्रात्यक्षिक (OPN 067) | प्रात्यक्षिक (०२) | १०० |
| ७. | अभ्यासकेंद्र भेट अहवाल (OPN 068) | अहवाल (०१) | १०० |
| | **एकूण** | | **५००** |

## ५. अभ्यासकेंद्रे

| क्र. | अभ्यासकेंद्राचे नाव व पत्ता | सांकेताक |
|---|---|---|
| १) | डॉ. नानासाहेब चिंचोलकर कनिष्ठ महाविद्यालय मु. पो. वाडेगांव, ता. बाळापूर, जि. अकोला | ११९०० |
| २) | कै. छगनलाल मुळजीभाई कढी आर्टस कॉलेज, अचलपूर कॅम्प, परतवाडा, जि. अमरावती | १२०५A |
| ३) | श्री. शिवाजी कॉलेज ऑफ एज्युकेशन, शिवाजी नगर, डॉ. पंजाबराव देशमुख चौक, अमरावती – ४४४ ६०६ | १२७५A |
| ४) | श्री. दादासाहेब तारे चॅरिटेबल ट्रस्ट, सावरकर नगर, बिलनपुरा, अचलपूर, जि. अमरावती –४४४ ८०६ | १२१२३ |
| ५) | रामकृष्ण शिक्षणशास्त्र महाविद्यालय आणि सौ. कमलाताई गवई डी.टी.एड. कॉलेज, मौजे वडाळी, उत्तमनगर, अमरावती | १२१२८ |
| ६) | मा.ना.श्री. विलासराव देशमुख अध्यापक महा. मु. निवाणा, ता. संग्रामपूर, जि. बुलडाणा | १३१०४ |
| ७) | नॅशनल एज्युकेशन सोसा.चे मातोश्री सायराबाई चंपालालजी चोपडा शिक्षणशास्त्र महाविद्यालय, सर्व्हे क्र.६७, प्लॉट क्र. ६३, टॅंक रोड, कॉटन मार्केटच्या मागे, खामगाव – ४४४३०३ जि. बुलढाणा | १३१४७ |
| ८) | स्व. गजानन माणिकरावजी गावंडे विज्ञान महाविद्यालय, सर्वे नं.१२७, ए.एन.एस. इंन्फोव्हॅली कॅंपस, चांदमारी चौक, शेलोडी रोड, मु.पो. खामगांव, जि. बुलडाणा | १३१०९ |
| ९) | कॉलेज ऑफ मॅनेजमेंट, दूरदर्शन केंद्राजवळ, वामननगर, मु.पो. खामगाव, जि. बुलढाणा – ४४४ ३०३ | १३९२A |
| १०) | त्यागी सेवामंडळाचे : डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज ऑफ डिस्टन्स एज्युकेशन, गांधी नगर, चर्चजवळ, यवतमाळ – ४४५ ००१ | १४७३A |
| ११) | श्री सरस्वती कॉलेज ऑफ सोशल वर्क, सरस्वती एज्युकेशनल कॅम्पस, रिसोड रोड, वाशीम ४४४७०५ | १५४५A |
| १२) | श्री नारायणराव नागरे कला व वाणिज्य महाविद्यालय मु.पो. दुसरबीड, ता. सिंदखेड राजा, जि. बुलढाणा ४४३३०८ | १३५२A |

| क्र. | अभ्यासकेंद्राचे नाव व पत्ता | सांकेताक |
|---|---|---|
| १३) | सरस्वती भुवन कला, वाणिज्य महाविद्यालय, औरंगपुरा, सरस्वतीनगर, औरंगाबाद–४३१००१ | २१०३A |
| १४) | मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे कला व विज्ञान महाविद्यालय, कुंभारपिंपळगाव, ता. घनसावंगी, जि. जालना – ४३१२११ | २३५४A |
| १५) | वसंतराव नाईक शिक्षण प्रसारक मंडळाचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, छत्रपती कॉलनी, जुना जालना – ४३१ २०३ | २३२१A |
| १६) | रामकृष्ण परमहंस महाविद्यालय (आर.पी.कॉलेज), उस्मानाबाद – ४१३ ५०१ | २६०२A |
| १७) | मातोश्री डॉ. कंचन शांतीलालजी देसरडा इंस्टिट्युट ऑफ एज्युकेशन, डी. के. एम. एम. मेडिकल कॉलेज कॅंपस, गुरुगणेश नगर, पहाडसिंगपुरा, औरंगाबाद | २११८७ |
| १८) | श्री संत गुलाबबाबा हस्तकला कार्यानुभव अध्यापक विद्यालय, घर क्रमांक ८१९, आंबेडकर वार्ड, गणेशपूर, ता. जि. भंडारा – ४४१९०४ | ४१५७A |
| १९) | ईश्वर देशमुख शारीरिक शिक्षण महाविद्यालय, क्रीडाचौक, हनुमान नगर, नागपूर – ९ | ४४२०३ |
| २०) | यशोदा गर्ल्स कला आणि वाणिज्य महाविद्यालय स्नेहनगर, वर्धा रोड, नागपूर – ४४० ०१५ | ४४३२९ |
| २१) | शिववैभव ज्युनियर कॉलेज ऑफ एज्युकेशन, बॅचलर रोड, मानस मंदिर, वर्धा – ४४२ ००१ | ४५४९A |
| २२) | जय दुर्गा हायस्कूल अँड ज्युनियर कॉलेज गौर नगर, ता. अर्जुनी भोर जि. गोंदिया – ४४१ ७०१ | ४६३१A |
| २३) | ज्ञानोपासक शिक्षण मंडळाचे शिक्षणशास्त्र महिला महाविद्यालय, दोंडाईचा, जि. धुळे | ५२७८A |
| २४) | डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क, मु.पो. मोराणे (नकाणे), जि. धुळे – ४२४ १०१ | ५२१३५ |
| २५) | के. टी. एच. एम. महाविद्यालय, शिवाजी नगर, गंगापूर रोड, नाशिक | ५४०४A |
| २६) | नाशिक एज्युकेशन सोसा. चे पेठे विद्यालय, रविवार कारंजा, नाशिक – ४२२ ००१ | ५४२०४ |
| २७) | कला, वाणिज्य महिला महाविद्यालय, जेलरोड, नाशिकरोड, नाशिक – ४२२ ०१० | ५४२४५ |
| २८) | ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट, पहिला मजला, महानगरपालिका बाजार, महात्मा नगर, नाशिक – ४२२ ००७ | ५४२८२ |

| क्र. | अभ्यासकेंद्राचे नाव व पत्ता | सांकेताक |
|---|---|---|
| २९) | के.व्ही.एन. नाईक शिक्षण प्रसारक संस्थेचे कला व वाणिज्य महाविद्यालय, उमराळे रोड मु. पो. दिंडोरी, जि. नाशिक | ५४४३४ |
| ३०) | नंदुरबार तालुका विधायक समितीचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नंदुरबार – ४२५ ४१२ | ५५०७A |
| ३१) | महात्मा फुले एम.एस.डब्ल्यू. आणि मातोश्री झवेरीबेन मोतीलाल तुरखिया बी.एस.डब्ल्यू. कॉलेज, काझीपूर रोड, मु. पो. ता. तळोदा, जि. नंदुरबार – ४२५ ४१३ | ५५५८A |
| ३२) | सी.टी. बोरा महाविद्यालय, शिरूर (घोडनदी) जि. पुणे – ४१२ २१० | ६२१४A |
| ३३) | ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट, सेकंड फेज, एल बिल्डींग, पिनाक मेमरीज, कोथरूड बस स्टँडजवळ, कोथरूड, पुणे –४११०३८ | ६२२५८ |
| ३४) | ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट, बागल मार्केट, पहिला मजला, राजारामपुरी, लेन नं.१, जनता बाजाराच्या वर, कोल्हापूर – ४१६ ००८ | ७११७९ |
| ३५) | कन्या महाविद्यालय, पो. बॉ. क्र.२९, छत्रपती शिवाजी नगर, मिरज, जि. सांगली–४१६ ४१० | ७२८०A |
| ३६) | श्री. पंचम खेमराज महाविद्यालय, सावंतवाडी, जि. सिंधुदूर्ग – ४१६५१० | ७४५१A |
| ३७) | संजिवनी महाविद्यालय, चापोली, ता. चाकूर, जि. लातूर – ४१३५१३ | ८४९१A |
| ३८) | डॉ. एस. एस. एम. प्रतिष्ठानचे अध्यापक महाविद्यालय, अहमदपूर, जि. लातूर | ८४१०३ |
| ३९) | यशवंत महाविद्यालय, मेनरोड, नांदेड – ४३१ ६०२ | ८५०१A |
| ४०) | विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अॅण्ड मॅनेजमेंट, VITM College, बिसेन नगर, न्यू मोंढा, नांदेड – ४३१ ६०२ | ८५२०८ |
| ४१) | दिगंबरराव बिंदू कला व वाणिज्य महाविद्यालय, मु.पो.ता. भोकर, जि. नांदेड | ८५७६A |
| ४२) | कै. शेषाबाई सिताराम मुंढे कला महाविद्यालय, गंगाखेड, जि. परभणी – ४३१५१४ | ८७१०३ |
| ४३) | रेनबो कॉम्प्युटर्स,शिवाजी नगर, हिंगोली – ४३१ ५१३ | ८८०१A |
| ४४) | शिवाजी कॉलेज, कोठलज रोड, हिंगोली – ४३१५१३ | ८८०४A |

| क्र. | अभ्यासकेंद्राचे नाव व पत्ता | सांकेताक |
|---|---|---|
| ४५) | प्रमोद रवींद्र धुरी अध्यापक महाविद्यालय गावठाणवाडी, माऊली मंदिर रोड, साळगाव मु. पो. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग – ४१६५२० | ७४७९A |
| ४६) | कै. शामराव पाटील टाकळीकर व्होकेशनल ट्रेनिंग सेंटर, मु. पो. धुप्पा, ता. नायगाव, जि. नांदेड | ८५२१६ |
| ४७) | माता रत्नेश्वरी सेवाभावी शिक्षण संस्था धारी संचलित, श्री. गुरू गोविंदसिंगजी महाविद्यालय, धारी पो. विढवुपूरी, ता. लोहा जि. नांदेड – ४३१ ६०६ | ८५२२२ |

## ६. विभागीय केंद्रे

**(१) अमरावती :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे अमरावती विभागीय केंद्र, व्ही.एम.व्ही. ते वलगाव रोड, पोस्ट व्ही.एम.व्ही. अमरावती – ४४४ ६०४
(०७२१) २५३१४४५
फॅक्स : (०७२१) २५३१४४४

**(२) औरंगाबाद:** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे औरंगाबाद विभागीय केंद्र सर्व्हे नं. ४१, सैनिकी मुलांचे वसतिगृहाच्या पूर्वेस नंदनवन कॉलनी, छावणी औरंगाबाद – ४३१ ००२
(०२४०) २३७१०७७ / २३७१०६६
फॅक्स : (०२४०) २३७१०८८

**(३) मुंबई :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे मुंबई विभागीय केंद्र द्वारा : जगन्नाश शंकरशेठ म.न.पा.ची मराठी प्राथमिक शाळा, दुसरा मजला, फ्रेअर ब्रीज (साऊथ), नाना चौक ग्रँट रोड (प.) मुंबई – ४०० ००७
(०२२) २३८७४१८६, २३८२६१३५
फॅक्स : (०२२) २३८१३२५६

**(४) नागपूर :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे नागपूर विभागीय केंद्र रावबहादूर डी. लक्ष्मीनारायण बंगला, विद्यापीठ क्रीडा परिसर, लॉ कॉलेज कँपस, रविनगर चौक, नागपूर – ४४० ००१
(०७१२) २५५३७२४/२५
फॅक्स: (०७१२)२५५३७२५

**(५) नाशिक :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे नाशिक विभागीय केंद्र, नाशिक महानगरपालिकेची जुनी इमारत, दुसरा मजला नवीन पंडित कॉलनी,नाशिक –४२२ ००२
(०२५३) २३१७०६३
फॅक्स : (०२५३) २५७६७५६

**(६) पुणे :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे पुणे विभागीय केंद्र शाहीर अण्णाभाऊ साठे प्रशालागृह, महापालिका शाळा क्र.५ (मुलांची), ६५४, सदाशिव पेठ हौदासमोर कुमठेकर मार्ग, पुणे –४११ ०३०
(०२०) २४४९११०७
फॅक्स : (०२०) २४४५७९१४

(७) **कोल्हापूर :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे कोल्हापूर विभागीय केंद्र
शिवाजी विद्यापीठ परिसर पोस्ट ऑफीसजवळ,
विद्यानगर, कोल्हापूर - ४१६ ००४
(०२३१) २६०७०२२
फॅक्स : (०२३१)२६०७०२३

(८) **नांदेड :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे नांदेड विभागीय केंद्र
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,
क्रीडा इमारत, नांदेड - ४२१ ६०६
(०२४६२) २२९९४०
फॅक्स : (०२४६२) २२९९५०
९४२२२९२६७२

## ७. विशेष सूचना/संपर्कासाठी

१. विद्यापीठाचे सध्याचे वा वेळोवेळी बदलणारे परिनियम, अधिनियम विद्यार्थ्यांवर बंधनकारक असतील.

२. अंतिम प्रवेश निश्चितीसाठी विद्यार्थ्यांनी अभ्यासकेंद्रावर स्वतः चौकशी करावयाची आहे. प्रवेश निश्चित झाल्याशिवाय परीक्षा देता येणार नाही.

३. विद्यार्थ्याने प्रवेश रद्द केल्यास त्यास शिक्षणक्रम शुल्क परत मिळणार नाही.

४. एखाद्या केंद्रावर कमी संख्येने प्रवेश झाल्यास विद्यार्थ्यास अन्य केंद्रावर वर्ग (Transfer) करण्यात येईल. केंद्र बदलाचे अधिकार विद्यापीठाने राखून ठेवले आहेत.

५. विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्जावर आपला पत्ता अचूक नोंदवावा.

६. शैक्षणिक सेवा विभागाने दिलेले निर्देश, सूचना विद्यार्थ्यांवर बंधनकारक असतील.

■ **संपर्क**
**शैक्षणिक बाबींविषयी**
**प्रा. डॉ. प्रमोद बियाणी**
प्राध्यापक व संचालक, शैक्षणिक सेवा विभाग
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक ४२२ २२२
दूरध्वनी : ०२५३-२२३००१० व २२३००४७

■ **निकालविषयक चौकशी**
उपकुलसचिव
परीक्षा विभाग, युनिट क्र. एक
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक ४२२ २२२
दूरध्वनी : ०२५३-२२३०७१६

■ **कार्यालयीन पत्रव्यवहाराचा पत्ता**

**प्रा. डॉ. प्रमोद बियाणी**
**संचालक, शैक्षणिक सेवा विभाग**
**(Academic Services Division)**
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक ४२२ २२२
दूरध्वनी : ०२५३ - २२३००१०
०२५३ - २२३००४७

■ **शैक्षणिक सेवा विभागाचा ईमेल:**
ycmou.asd@gmail.com

## शैक्षणिक सेवा विभागाचे (Academic Services Division) चे शिक्षणक्रम

**प्रमाणपत्र स्तर :** (१) संमंत्रक प्रशिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रम
(२) मानवी हक्क प्रमाणपत्र शिक्षणक्रम

**पदविका स्तर :** (१) गांधी विचार दर्शन पदविका शिक्षणक्रम

■■■

# ८. परिशिष्टे

## परिशिष्ट १ : समंत्रक प्रशिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रमाचा पाठ्यक्रम (Syllabus)

### ■ दूरशिक्षण (OPN 041)

(०१) दूर शिक्षण – गरज, अर्थ, व्याख्या, व्याप्ती
(०२) वैशिष्ट्ये
(०३) दूर शिक्षणाचा विकास व इतिहास
(०४) प्रतिमाने
(०५) समस्या
(०६) भवितव्य
(०७) दूर शिक्षणाची संप्रेषणाची मुख्य साधने/घटक
(०८) पारंपरिक शिक्षण व दूर शिक्षण यांतील फरक
(०९) पारंपरिक शिक्षण व दूर शिक्षणातील विद्यार्थी – तुलना व वैशिष्ट्ये
(१०) प्रौढ व निरंतर शिक्षण
(११) अनौपचारिक शिक्षण

### ■ मुक्त विद्यापीठातील शिक्षण (OPN 042)

(०१) मुक्त शिक्षण/मुक्त विद्यापीठ : संकल्पना
(०२) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची संरचना
(०३) अध्ययन साहित्याची वैशिष्ट्ये
(०४) मुक्त विद्यापीठाची शिक्षणक्रम राबविण्याची यंत्रणा
(०५) स्वयं-अध्ययन आणि स्वयं-मूल्यमापन
(०६) मुक्त विद्यापीठाची परीक्षा आयोजन कार्यपद्धती

### ■ संमंत्रण कौशल्ये (OPN 043)

(०१) संमंत्रण – व्याख्या, संकल्पना व स्वरुप
(०२) संमंत्रणाची उद्दिष्टे
(०३) संमंत्रण/मार्गदर्शन/व्याख्यान यांतील फरक
(०४) संमंत्रकांचे गुणविशेष व कौशल्य
(०५) संमंत्रण करताना पाळावयाची तत्त्वे/पथ्ये
(०६) संमंत्रकाची कार्ये व भूमिका
(०७) संमंत्रणाचे प्रकार व माध्यमे
(०८) संमंत्रणात दृक्-श्राव्य साधनांचा उपयोग
(०९) संमंत्रणाद्वारे विद्यार्थ्यांच्या शंका निरसनासाठी लागणारी कौशल्ये – संकल्पना सुलभीकरण/भाषिक कौशल्ये/ अध्ययन साहित्याचा शंकानिरसनासाठी वापर
(१०) संमंत्रणातील अडथळे आणि त्यावरील उपाययोजना
(११) मुक्त शिक्षणातील संमंत्रणाची अपरिहार्यता
(१२) मुक्त विद्यापीठात वापरले जाणारे पारिभाषिक शब्द व त्यांचे अर्थ

### ■ विद्यार्थ्यासाठी मानसशास्त्रीय समुपदेशन व मार्गदर्शन (OPN 065)

**प्रकरण : १.० प्रस्तावना**

१.० समुपदेशन मानसशास्त्र
१.१ समुपदेशनाची व्याख्या
१.२ समुपदेशन आणि मार्गदर्शन यांतील फरक
१.३ समुपदेशनाची ध्येये
(अ) तत्काळ ध्येये, (ब) दीर्घकालीन ध्येये, (क) मुख्य ध्येये
१.४ समुपदेशनाची मूलभूत तत्त्वे आणि कौशल्ये
१.५ समुपदेशनातील व्यावसायिक आणि नैतिक समस्या

**प्रकरण : २.० मानसशास्त्रीय मार्गदर्शन**

२.१ मार्गदर्शनाची व्याख्या आणि अर्थ
२.२ मार्गदर्शनाचे स्वरूप आणि व्याप्ती
२.३ मार्गदर्शनाची मुख्य गुणवैशिष्ट्ये

**प्रकरण : ३.० प्राथमिक शाळेतील मुलांचे समुपदेशन आणि मार्गदर्शन**

३.१ प्राथमिक शाळेतील मार्गदर्शनाचे महत्त्व
३.२ प्राथमिक शाळेतील मुलांचे स्वरूप, समस्या
३.३ समुपदेशकाची भूमिका

**प्रकरण : ४.० माध्यमिक शाळेतील मुलांचे समुपदेशन आणि मार्गदर्शन**

४.१ माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांचे स्वरुप
(अ) किशोरवयीन मुले –
(१) शारीरिक बदल, (२) विकास,
(३) अभिवृत्ती, (४) अभिरूची

४.२ शैक्षणिक कालखंडातील गरजांसाठी मार्गदर्शन
(अ) समायोजन , (ब) अध्ययन,
(क) महाविद्यालयीन प्रवेशाबाबत चर्चा

४.३ वैयक्तिक विकासासाठी मार्गदर्शनाची गरज
(अ) भावनिक विकास, (ब) शारीरिक विकास,
(क) सामाजिक विकास, (ड) लैंगिक विकास

**प्रकरण : ५.० विशेष गरजा असणारी अथवा अपवादात्मक मुले अथवा विद्यार्थ्यांकरिता समुपदेशन**

५.१ भावनिक दृष्ट्या गोंधळलेली मुले (अ) व्याख्या, (ब) समस्या आणि समुपदेशकाची भूमिका
५.२ अध्ययन अक्षम विद्यार्थी :
(१) संकल्पना व व्याख्या, (२) प्रकार,
(३) ओळख आणि गुणवैशिष्ट्ये
(४) शिक्षक अथवा समुपदेशकाची भूमिका

५.३ प्रज्ञावंत अथवा कुशाग्र विद्यार्थी
(१) संकल्पना व व्याख्या
(२) ओळख
(३) गुणवैशिष्ट्ये
(४) शिक्षक अथवा समुपदेशकाची भूमिका

५.४ मतीमंद

**प्रकरण : ६.० महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना समुपदेशन**

६.१ विद्यार्थ्यांना सेवांची भूमिका
६.२ महाविद्यालयीन समुपदेशकाची भूमिका
६.३ अपारंपरिक विद्यार्थ्यांसाठी समुपदेशकाची भूमिका

**प्रकरण : ७.० विद्यापीठीय विद्यार्थ्यांना समुपदेशन**

(टीप : विद्यार्थ्यांनी परिशिष्ट क्र. ९.३ मधील याच पाठ्यक्रमाचे इंग्रजी भाषांतर वाचावे)

## सर्वसाधारण मानसशास्त्रीय समुपदेशन (OPN 066)

**प्रकरण : १.० समुपदेशन**

१.१ समुपदेशनाच्या व्याख्या
१.२ समुपदेशनाची ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि सद्यस्थिती
१.३ आधुनिक भारतातील समुपदेशन

**प्रकरण : २.० समुपदेशन प्रक्रिया**

२.१ समुपदेशनाची तयारी
२.२ समुपदेशन नातेसंबंध
२.३ समुपदेशन प्रक्रियेतील टप्पे

**प्रकरण : ३.० समुपदेशनातील आंतरक्रिया**

३.१ समुपदेशन आंतरक्रियेची व्याख्या
३.२ समुपदेशकावर परिणाम करणारे घटक
३.३ प्रभावी समुपदेशक कोण?

**प्रकरण : ४.० समुपदेशनाची मुलाखत तंत्रे**

४.१ मुलाखतीसाठी आवश्यक घटक
४.२ मुलाखतीमधील अशाद्बीक संप्रेषण
४.३ समुपदेशनातील मुलाखत तंत्रे

**प्रकरण : ५.० विशेष समुहाचे समुपदेशन**

५.१ तरूणांसाठी समुपदेशन
५.२ वैवाहिक आणि कौटुंबिक जीवनाकरिता समुपदेशन
५.३ अल्पसंख्यांक समुहाचे समुपदेशन

**प्रकरण : ६.० समुपदेशनाचे उपयोजन – १**

६.१ कौटुंबिक समुपदेशन
६.२ पालक समुपदेशन
६.३ करीअर (जीवनमार्ग) समुपदेशन

**प्रकरण : ७.० समुपदेशनाचे उपयोजन – २**

७.१ वृद्धावस्थेचे समुपदेशन
७.२ मानसिक आरोग्याचे समुपदेशन
७.३ पुनर्वसनात्मक समुपदेशन
(टीप : विद्यार्थ्यांनी याच पाठ्यक्रमाचे इंग्रजी भाषांतरही परिशिष्ट क्र.९.४ मधून वाचावे)

## संदर्भ पुस्तके (मराठी)


१. प्रा. बी. एस. पवार आणि प्रा. डॉ. जी.बी. चौधरी (२००४) समुपदेशन मानसशास्त्र, प्रशांत पब्लिकेशन, पुणे
२. प्रा. डॉ. दादासाहेब शिरगावे, डॉ. भरत नाईक, प्रा. अनिल बस्ते, प्रा. दिलीप बिराजे (२००६) : समुपदेशन मानसशास्त्र (बी.ए. भाग–२), निराली प्रकाशन, पुणे
३. प्रा. दादासाहेब शिरगावे, डॉ. भरत नाईक, प्रा. गस्ते, प्रा. बिराजे (२०११), समुपदेशन मानसशास्त्र (बी.ए. भाग २) सेमि. १,२ (२०१३), निराली प्रकाशन, पुणे
४. प्रा. डॉ. चंद्रशेखर देशपांडे, संपादक, सहलेखक, डॉ. कुमठेकर, डॉ. देशपांडे व इतर (२०१०) : समुपदेशन शास्त्रीय प्रक्रिया व उपयोजन, उन्मेष प्रकाशन, पुणे – ३०
५. प्रा. हिरवे प्रा. तडसरे (२०११) : समुपदेशन मानसशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर
६. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर दूरशिक्षण केंद्र – समुपदेशन मानसशास्त्र, बी.ए. भाग–२, ऐच्छिक पेपर २००८
७. साधना कामत (२०१०) : मानसशास्त्रीय मार्गदर्शन स्वरूप व कार्यपद्धती पॉप्युलर प्रकाशन, मुंबई
८. शशी सरवदे (२००८) : शैक्षणिक मार्गदर्शन आणि समुपदेशन, डायमंड प्रकाशन, पुणे


**Book for Reading**


1. Dash M. (2003) : Education of Exceptional Children, Atlantic Pub. New Delhi
2. Madhukar Indira (2000) : Guidance and Counseling, Antherpress, New Delhi.
3. Nayak A. K. (2007) Guidance and Counseling, APH publishing, Corporation, New Delhi
4. Nayak A. K. & Rao V. K. (2007) : Guidance and Career Counseling, ATH Publishing Corporation, New Delhi.
5. Patri V. R. (2007) : Guidance and counseling Auditor Press, New Delhi
6. Sharma, S. P. (2006) : Career Guidance and Counseling, Karishka Pub. New Delhi.
7. Siddiqui M. H. (2008) : Guidance and Career Counseling, APH Publishing corporation, New Delhi
8. Shrivastava K. K. (2006) : Principles of Guidance & Counseling Krishna Publication, New Delhi
9. Om Prakash Aneja (2010) : Guidance and Counselhing, KSK publishers and Distributors, New Delhi.
10. S. K. Kochar (2010) : Guidance and Counseling in College and Universities, Sterling Publishers Pvt. New Delhi.
11. Rao, Narayan S. (1997) : Counseling and Guidance, New 12, Tata McGraw Hill Publication Co. Ltd., New Delhi
12. Woolfe, Drayden and Strawbridge (2003) : Handbook of Counseling Psyenology, Sage Publications, New Delhi

## Psychological Counseling and Guidance for Students (OPN 065)

**1. Introduction**

1.0 Counseling Psychology

1.1 Definition of Counseling

1.2 Defference between guidance and counseling

1.3 Goal of Counseling
(a) Immediate goals
(b) Long range goals
(c) Major goals of counseling

1.4 Basic Principles and skill in counseling

1.5 Professional and Ethical issues in counseling

**2. Guidance Psychology**

2.1 Definition and meaning of Guidance

2.2 Nature and scope of Guidance

2.3 Main Characteristics of Guidance

**3. Counseling and Guidance for students of Elemtary School**

3.1 Importance of Guidance in elemen tary School

3.2 Nature and problems of the children in elementary School

3.3 The Role of counselor

**4. Counseling and Guidance for Students of Secondary School**

4.1 Nature of Secondary School stu dents
(a) Adolescents
1. Physical Change
2. Development
3. Attitude
4. Interest

4.2 Guidance Needs Related to Edu cation
(a) Adjustment, (b) Learning,
(c) Disussions about college selection

4.3 Guidance Needs Related to Personal Development
(a) Emotional Development
(b) Physical Development
(c) Social Development
(d) Sexual Development

**5. Counseling for Special or Exceptional children or students**

5.1 Emotionally Disturbed Children
(a) Definition
(b) Problems of E.D.C. & Role of counselor

5.2 Learning Disabled Students
The concept and definition
Type of L.D.
Identification and Characteristics of L.D. Students
Role of Teacher or Counselor

5.3 Gifted or Talented students
Who are the gifted students?
Identification of gifted students
Characteristics of gifted students
Role of Teacher or Counselor
Differently abled Learners

**6. Counseling to college students**

6.1 Role of Students services

6.2 Role of College Counselor

6.3 Role of Counselor for Nontraditional Students

**7. University Students' Counseling**

## General Psychological Couseling (OPN 066)

**1. Counseling**

1.1 Definitions of Counseling

1.2 Historical background of counseling & current status

1.3 Counseling in modern India

**2. Counseling Process**

2.1 Preparation for Counseling

2.2 Counseling Relationship

2.3 Steps in counseling process

**3. Counseling Interactions**

3.1 Definition of counseling Interaction

3.2 Elements affecting counselor
3.3 Who is an effective counselor?

**4. Interview Techniques of Counseling**
4.1 Essential aspects of interviewing
4.2 Non Verbal communication in interview
4.3 Interviewing Techniques in counseling

**5. Counseling of Special Group**
5.1 Counseling for youth
5.2 Counseling for marriage and family life
5.3 Counseling the minority member

**6. Applications of Counseling - 1**
6.1 Family Counseling
6.2 Parent Counseling
6.3 Career counseling

**7. Applications of Counseling - 2**
7.1 Old age counseling
7.2 Mental Helath Counseling
7.3 Rehabilitation Counseling

## परिशिष्ट २ : कृतिसत्रांचे वेळापत्रक

### ■ पहिले कृतिसत्र

सकाळी १० ते १०.४५ : विद्यार्थ्यांची नाव नोंदणी व अध्ययन साहित्य वितरण

सकाळी १०.४५ ते ११.१५ : उद्‌घाटन

सकाळी ११.१५ ते ११.३० : चहा

सकाळी ११.३० ते १२.१५ : दूरशिक्षण संकल्पना व तत्त्वज्ञान

दुपारी १२.१५ ते १.०० : मुक्त विद्यापीठातील शिक्षणक्रम ·मलबजावणी कार्यपद्धती

दुपारी १.०० ते २.०० : भोजनाची सुट्टी

दुपारी २.०० ते ३.०० : संमंत्रण – संकल्पना, उद्दिष्टे, गरज आणि समंत्रकांसाठी आवश्यक कौशल्ये

दुपारी ३.०० ते ४.०० : दूरशिक्षणातील संमंत्रणाचे महत्त्व आणि संमंत्रण करतेवेळी घेण्याची काळजी

दुपारी ४.०० ते ४.१५ : चहापान

दुपारी ४.१५ ते ४.४५ : पुढील कृतिसत्राबाबत सूचना/प्रात्यक्षिक व स्वाध्याय लेखन याबाबत सूचनाः केंद्रसंयोजक

### ■ दुसरे कृतिसत्र

सकाळी १० ते ११.०० : संमंत्रणाची पूर्वतयारी व माध्यमांचा वापर

सकाळी ११.०० ते ११.१५ : चहा

सकाळी ११.१५ ते १२.०० : प्रौढ व अनौपचारिक शिक्षण

दुपारी १२.०० ते १.०० : अध्ययन कौशल्ये व त्यावरील प्रभुत्व

दुपारी १.०० ते २.०० : भोजनाची सुट्टी

दुपारी २.०० ते २.४५ : प्रात्यक्षिक मार्गदर्शन – प्रात्यक्षिक कसे करावे? (नमुना चालवून दाखविणे)

दुपारी २.४५ ते ३.४५ : गटचर्चा (गटनिहाय एका प्रात्यक्षिकाचे लेखन)

दुपारी ३.४५ ते ४.०० : चहापान

दुपारी ४.१० ते ५.१५ : गटचर्चेचे सादरीकरण (प्रत्येक गटप्रमुखास १५ मिनीटे द्यावीत. २५ विद्यार्थ्यांचा एक गट असे चार गट करावेत)

## ■ तिसरे कृतिसत्र

सकाळी १० ते ११.०० : समुपदेशन–प्रक्रिया व आंतरक्रिया/समुपदेशन व मार्गदर्शन

सकाळी ११ ते १२.०० : समुपदेशनाची मुलाखत तंत्रे

सकाळी १२ ते १२.१५ : चहा

दुपारी १२.१५ ते १.१५ : विशेष समुहाचे समुपदेशन

दुपारी १.१५ ते २.१५ : भोजनाची सुट्टी

दुपारी २.१५ ते ३.१५ : प्राथमिक शालेय विद्यार्थ्यांचे समुपदेशन व मार्गदर्शन

दुपारी ३.१५ ते ४.१५ : माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांचे समुपदेशन व मार्गदर्शन

दुपारी ४.१५ ते ४.३० : चहा

दुपारी ४.३० ते ५.३० : महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे समुपदेशन व मार्गदर्शन

## ■ चौथे कृतिसत्र

सकाळी १०.०० ते १०.१५ : केंद्र भेटीसाठी निश्चित करण्यात आलेल्या मुक्त विद्यापीठाच्या अभ्यासकेंद्रावर विद्यार्थ्यांनी एकत्र जमणे.

सकाळी १०.१५ ते ११.०० : पाहणी करावयाच्या अभ्यासकेंद्राच्या अभ्यासकेंद्र संयोजकाचे अभ्यासकेंद्राच्या कामकाजाबाबत विवेचन, दूरशिक्षणातील अभ्यासकेंद्राची भूमिका व कार्यपद्धती, प्रश्न समजावून घेणे, चर्चा.

सकाळी ११.०० ते १२.०० : अभ्यासक्रमाच्या प्रत्यक्ष संमंत्रणसत्रामध्ये प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांची उपस्थिती व निरीक्षण.

दुपारी १२.०० ते ०१.०० : अभ्यासक्रमाच्या प्रत्यक्ष संमंत्रणसत्रामध्ये प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांची उपस्थिती निरीक्षण.

दुपारी १.०० ते २.०० : जेवणाची सुटी

दुपारी २.०० ते ३.०० : पाहणी करावयाच्या अभ्यासकेंद्राच्या 'अभ्यासकेंद्र कार्यालयास' भेट व निरीक्षण.

दुपारी ३.०० ते ३.३० : कोणत्याही एका अभ्यासक्रमाच्या संमंत्रकाचे (अध्यापकाचे) संमंत्रण सत्रांबद्दल विवेचन व संमंत्रकाशी चर्चा, संमंत्रण–सत्रातील संमंत्रकाची भूमिका व प्रश्न समजावून घेणे.

दुपारी ३.३० ते ४.०० : संबंधित अभ्यासकेंद्रावरील सहायकाचे प्रशासकीय कामाबद्दल विवेचन.

दुपारी ४.०० ते ४.३० : संबंधित अभ्यासकेंद्रावरील विद्यार्थी व प्रशिक्षणार्थी विद्यार्थी यांची चर्चा

दुपारी ४.३० ते ५.०० : शंकासमाधान व समारोप.

## विद्यापीठ गीत



एक प्रतिज्ञा असे आमुची ज्ञानाची साधना ।
चिरंतन ज्ञानाची साधना ।
ज्ञान हेच संजीवन साऱ्या जगताच्या जीवना ।। धृ ।।

ज्योत जागवू सुजाणतेची सकलांच्या अंतरी ।
तीच निवारील पटल तमाचे प्रभात सूर्यापरी ।
ज्ञानच देउळ, ज्ञानच दैवत, प्रगतीच्या पूजना ।। १।।

नव्या युगाचा नव्या जगाचा ज्ञान धर्म आहे ।
त्यातच अमुच्या उजळ उद्याचे आश्वासन राहे ।
मुक्त करिल तो परंपरेच्या बंदिघरातुन मना ।। २ ।।

हाच मंत्र नेईल आम्हाला दिव्य भविष्याकडे ।
न्यायनीतीचे पाऊल जेथे भेदाशी ना अडे ।
जे जे मंगल पावन त्याची जेथे आराधना ।। ३ ।।

*कुसुमाग्रज*


**निर्मिती**

श्री. आनंद यादव

व्यवस्थापक, ग्रंथनिर्मिती केंद्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक – ४२२ २२२



© २०२१, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक



- **प्रथम प्रकाशन :** जुलै २०२१
- **अक्षरजुळणी** : ओम कॉम्प्युटर्स, नाशिक – ४२२ ००७
- **प्रकाशक** : डॉ. दिनेश भोंडे, कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक – ४२२ २२२.

**NB21-22-17**